महाराष्ट्र शासन
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर.
Vilasrao Deshmukh Government Medical College, Latur.
(Office of the Dean)
Phone No./Fax No. :- 02382-253017.
Website: vdgmclatur.org Email :- dean_gmchl@rediffmail.com

Vilasrao Deshmukh Government Medical College, Latur

जा.क्र. विदेशावैमला/विशा/पी.जी./वरिष्ठ निवासी/ ४४५७ /२०२५, दिनांक :- २७ /११/२०२५.

# Walk-In-Interview

शासन निर्णय क्रमांक -एलइसी-४३२२/प्र.क्र.२०१/शिक्षण-३, दिनाकं :-०६.०१.२०२३ अन्वये विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूरयेथील डॉक्टरांची कमतरता आणि रुग्णालयातील वाढती रुग्णसंख्या पाहता तसेच राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मुल्यांकनाच्या दृष्टीकोनातून खालील प्रमाणे वरिष्ठ निवासी संवर्गातील पदे निवड समितीमार्फत तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी अहर्ताप्राप्त पात्र उमेदवारांना दिनांक २८.११.२०२५, दुपारी १२:०० वाजता मुलाखतीसाठी बोलविण्यात येत आहे. उमेदवारांनी अर्ज विहीत मार्गाने व विहीत नमुन्यात सादर करावा. अन्यथा त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरिष्ठ निवासीचे पदे विभागानुसार खालील प्रमाणे आहेत.

| Sr No | Subject | SR Vacant Post | Sr No | Subject | SR Vacant Post |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Anatomy | 06 | 7 | Orthopedics | 03 |
| 2 | Physiology | 04 | 8 | TB & Chest | 01 |
| 3 | Biochemistry | 04 | 9 | Psychiatry | 01 |
| 4 | Pharmacology | 04 | 10 | Gen. Medicine | 02 |
| 5 | FMT | 03 | 11 | Pathology | 01 |
| 6 | Microbiology | 02 | | | |
| | | | | Total :- 31 | |

**शैक्षणिक अर्हता:-** **वरिष्ठ निवासी:-** राष्ट्रीय/भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार व महाराष्ट्र मेडिकल कौन्सीलची एम.बी.बी.एस. व पदव्युत्तर पदवी कायम नोंदणी आवश्यक आहे.

**वेतन:-** प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय विद्यावेतन.

**वयोमर्यादा:-** वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे:-** अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा आपल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

०१. प्रथम,द्वितीय,तृतीय वर्ष एमबीबीएस गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्र, ०२.एमडी/एमएस/पदवीका (डिप्लोमा) परीक्षा गुणपत्रिका/प्रमाणपत्र व प्रयत्न प्रमाणपत्र, ०३. एमबीबीएस व एमडी/एमएस/पदविका एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र, ०४. बंधपत्रीत उमेदवार असल्याबाबत महाविद्यालयाचे पत्र, ०५.अनुभव प्रमाणपत्र.०६.जन्म तारखेकरीता एसएससी प्रमाणपत्र, ०७. आधार कार्ड झेरॉक्स.

वरीष्ठ निवासी पदाकरिता उमेदवारांची नियुक्ती अस्थाई स्वरुपाची राहील, व उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल. रुजु होतेवेळेस रु.२५०००/- (अनामत रक्कम) जमा करावे लागेल व पुर्व सुचना न देता राजीनामा दिल्यास अनामत रक्कम मिळणार नाही.

नोट :-

०१.सदरील वरिष्ठ निवासी यांची पदे ही बंधपत्रीत उमेदवारासाठी असल्यामुळे महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यार्थ्यांचा वरिष्ठ निवासी या पदासाठी विचार केला जाणार नाही.
०२.विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर येथील पदव्युत्तर पदवी पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्राध्यान्य देण्यात येईल.
०३. यापुर्वी या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे काम करीत असताना आपले काम असमाधानकारक असल्यामुळे जर आपली नियुक्ती रद्य केली असल्यास आपल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही.
०४.वरील जाहिरातीमधील पदांच्या संख्येत कमी/अधिक करण्याचा तसेच निवड समिती मार्फत निवड झालेल्या उमेदवाराचे नियुक्ती आदेश निर्गमीत करण्याचा अथवा प्रलंबीत ठेवण्याचा अथवा नियुक्ती रद्द करण्याचा अथवा सदर जाहिरात रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवण्यांत येत आहे.
०५.आपली नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत असून आपल्या विभागात जर संचालनालय, वैद्यकीय
शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या विभागीय निवड मंडळामार्फत उमेदवार उपलब्ध झाल्यास आपले आदेश तात्काळ रद्द करण्यात येतील

अधिष्ठाता,
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, लातूर.

DEAN
Vilasrao Deshmukh Government
Medical College, Latur

प्रत:-

१. मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,.......
३. सर्व संबंधीत प्राध्यापक व विभाग प्रमुख,विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,लातूर
४. सुचना फलक, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,लातूर